
चिमुकलं
शान्ता शेळके

# चिमुकलं

शान्ता · शेळके

वाचा शिवाय रंगवा

१० रुपये



गमभन प्रकाशन



प्रकाशक :
ल.म.कडू
गमभन प्रकाशन
३७९ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

मुद्रक :
राज प्रिंटर्स
७५९, कसबा पेठ
पुणे ४११ ०११

© प्रकाशक

प्रथमावृत्ती :
फेब्रुवारी १९९२
द्वितीयावृत्ती :
फेब्रुवारी १९९९
तृतीयावृत्ती :
डिसेंबर २००१

सजावट :
ल.म. कडू

ISBN No.
81-87012-12-9



३

# चिमुकलं



चिमुकलं पाखरू
अंगणात आलं
दाणे टिपले
नाचून गेलं

चिमुकलं ऊन
दारातून आलं
भिंतीवर कवडसा
पाडून गेलं



चिमुकलं वारं
झाडात हललं
फांदीवरचं
पान पान डुललं!



चिमुकलं बाळ
रांगत आलं
मांडीवर बसलं
खुदकन हसलं!

४

# गजरा

वेलीवरी फुलांऐवजी
फुलतील फुलपाखरे
निळे जांभळे पिवळे दिसतील
रंग किती गोजिरे !

भरभर खुडुनी फूलपाखरे
गजरा मी गुंफिन
निळी जांभळी पिवळी शोभा
वेणीवरी माळीन !



५

# टाळिया नंदा

टाळिया नंदा
बाळ गोविंदा
घागरिया छंदा
बाळ आनंदा !





सावळिया हाती
रंगीत काठी
बाळ जाय रानी
गाय चाले पाठी !

गाय देते भरून
दुधाची लोटी
गोड गोड दूध
बाळ लावी ओठी !

६

# बाळ माझे गुणी



बाळ माझे गुणी
बघू नका कुणी
अंगामधे झूल
कानांमधे डूल

गुबगुबीत अंग
खेळामधे दंग
किती पडू झडू
डोळा नाही रडू

शहाणे ग बाई
करी गाई गाई
गुणी माझे बाळ
देवा तू सांभाळ
०



७

# पाऊस

पाऊस पडतो टप टप टप
पाउल टाका झप झप झप

पाऊस पडतो थेंब थेंब थेंब
कपडे झाले ओले चिंब

पाऊस पडतो सर सर सर
लौकर गाठा आपले घर

पाऊस पडतो मुसळधार
जिकडे तिकडे गारीगार

पाऊस धावुन आला रे
बंद राहिली शाळा रे !



# कोंबडा

डोईवर हलतो
तुरा छान तांबडा
सकाळीच उठून
आरवतोय कोंबडा





१

कोंबडेरावांचा
काय तरी थाट
झोकदार पिसारा
मान कशी ताठ!

कु कु च कू
कु कु च कू
काय सांगतो कोंबडा
चला तरी ऐकू!

कोंबडा सांगतो
आळस खोटा
अंथरूण सोडून
झटकन उठा

कोंबडेदादा
उठतेच रे मी!
तोंड धुवून कामाला
लागतेच रे मी!

१०

# लाल लाल

मनीने घातला लाल लाल झगा
हातात घेतला लाल लाल फुगा

केसात बांधली रिबन लाल
मनीचे गाल लाल लाल लाल

वेणीत हलते लाल लाल फूल
कानात डुलती लाल लाल डूल

तोंडात गोळी लिमलेटची लाल
जीभ पण झाली लालच लाल !



११

# शंका



फुला रे फुला
लाला रंग, गोड वास कुणी दिला तुला ?
गोगलगाई
लांब लांब शिंगे तुला कशी फुटली बाई ?
अग मनीमाऊ
अंधारात तुला कसे दिसते सांग पाहू ?
मोरा रे मोरा
कुणी दिला तुला असा लखलख तुरा ?
आई ग आई
इतके काम करून तू दमत कशी नाही ?



# चिऊ चिमणी

चिऊ चिमणी
आली अंगणी

बघा हळूच
मारते चोच !

दाणा टिपते
नाच नाच ते



चिवचिवते
किलबिलते

वाजवू टाळी ?
अरे, पळाली !



# उंदीरमामा

खुडबुड खुडबुड कोण करी ?
उंदीरमामा आले घरी !

सुळसुळ सुळसुळ ते पळती
कुठे कळेना मग लपती !

फळीवरी पटकन चढती
कधी खोबरे कुरतडती

मिशा कशा या थरथरती
शेपुट वळवुन मग फिरती

मनी मांजरी गुरगुरली
मामांना धडकी भरली



# हार ग गाई

हार ग गाई हरकूली
काखेत घेतली कुरकूली

बाळ जाते बोरांना
हाका मारते पोरांना

तांबडी पिवळी बोरे
गोळा झाली पोरे





१५

बाळाने बोरे वेचली
सगळी पोरे नाचली

कुरकुली भरली बोरांनी
झडप घातली पोरांनी

बाळाची बोरे सांडली
सगळी पोरे भांडली !





# पाढे



एक दोन
पाहू पाढे लिहितो कोण ?

तीन चार
बाळू अमुचा फार हुशार ?






पाच सहा
पाढे करतो पाठ पहा

सात आठ
ओ हो ! याला सारे पाठ

नऊ दहा
खाउ देऊ या बाळुस हा !

गमभन
प्रकाशन

